MHPU180021622016

# निशाणी क्र.५१ वरील आदेश

(दिनांक ०२.०४.२०२४)

सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीर माफ करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्याचे कामकाज चालु असतांना या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत या दि.०४.०४.२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. तसा त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठीचा वेगळा अर्ज दाखल केलेला आहे. सदरील प्रतिवादी क्र.२ या महिला असुन त्या वादींच्या घरापासुन काही अंतरावर राहत असुन त्यांना त्याची कल्पना झाली नाही. तसेच सदरील वारस रेकॉर्डवर घेण्याबाबतच्या अज्ञानामुळे सदरील माहिती घेऊन वेळेत वारस रेकॉर्डवर घेणे शक्य झाले नाही. माहिती मिळाल्यानंतर खुप दिवस वारस दाखला उपलब्ध होत नव्हता, त्यामुळे सुध्दा अर्ज दाखल करण्यास उशीर झालेला आहे.

३. त्यांचे पुढे असे कथन आहे की, सदरील दावा हा स्थावर मिळकतीच्या मालकी हक्काच्या संदर्भात असुन त्यामध्ये सदरील प्रतिवादी हे दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे संबंधीत पक्षकारांचे वारस त्यांचे मृत्युपश्चात रेकॉर्डवर घेणे आवश्यक असते. तसे न झाल्यास सदरील दावा तांत्रिक कारणास्तव फेटाळला जाऊन वादींचा जो मुलभूत कायदेशीर हक्क आहे तो त्यांना मिळणार नाही आणि त्यांच्या मिळकतीचे ति–हाईत फुकटात मालक होतील. म्हणुन वरीलप्रमाणे वादी आपला हक्क मागत असतांना दाव्याची गुणदोषावर सुनावणी होऊन सत्यस्थिती मे. कोर्टापुढे येणार आहे आणि त्यानुसार वादाचे अंतिम निराकरण होणार आहे. त्यामुळे या वारस रेकॉर्डवर घेण्यास वादींकडुन झालेला उशीर माफ करुन मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी सदर अर्जावर प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना नोटीस काढण्याचा आदेश केलेला होता. त्यानंतर ते आजपावेतो वादींनी प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना नोटीसची बजावणी होण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले दिसुन येत नाही. त्यामुळे सदर अर्ज पुढे चालविण्याचा अर्ज मी आज रोजी केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र.३ यांनी नि.५८ अन्वये सदर अर्जास विरोध करुन त्यांचा जबाब दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादींनी दाखल केलेला विलंब माफीचा

अर्ज पुर्णपणे बेकायदेशीर स्वरुपाचा असुन फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत या दि.०४.०४.२०१८ रोजी मयत झाल्याबाबतचा उल्लेख केलेला आहे. अशी परिस्थिती असतांना वादी मुदतीमध्येच वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे होते. परंतु वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी किती दिवसांच्या कालावधीचा उशीर झालेला आहे याचा देखील उल्लेख त्यांच्या विलंब माफीच्या अर्जामध्ये केलेला नाही. वादी त्यांच्या अर्जामध्ये मान्य करतात की, प्रतिवादी क्र.२ या महिला असुन त्या वादींच्या घरापासुन काही अंतरावर राहत असुन त्यांना त्याची कल्पना झाली नाही. तसेच वारस रेकॉर्डवर घेण्याबाबतच्या अज्ञानामुळे सदर माहिती घेऊन वेळेत वारस रेकॉर्डवर घेणे शक्य झाले नाही. माहिती मिळाल्यानंतर वारस दाखला उपलब्ध होत नव्हता त्यामुळे सुध्दा अर्ज दाखल करण्यास उशीर झाला आहे. या सर्व नमुद कारणांचा विचार केल्यास वादी यांनी न पटणारे कायदेशीर कारण नमुद केलेले नाही. वादींनी मे. कोर्टात मयताचा दाखला उपलब्ध होत नसल्याबाबत अर्ज देखील दाखल करणे गरजेचे होते. परंतु तशा आशयाचा अर्ज देखील मे. कोर्टात दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्ज हा बेकायदेशीर स्वरुपाचा असुन मुदतीत दाखल केलेला नसल्यामुळे फेटाळण्यास पात्र आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

**६.** वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एस. गवळी व प्रतिवादी क्र.३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. एस. महाजन यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**७.** अर्ज व जबाब वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींनी नि.५६ यादीलगत प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत यांचे मृत्युप्रमाणपत्र नि.९९ अन्वये दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि.०४.०४.२०१८ रोजी कांताबाई यशवंत भागवत यांचे निधन झालेले आहे. त्यानंतर ९० दिवसांच्या आत म्हणजेच दि.०३.०७.२०१८ रोजीपावेतो प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक व गरजेचे होते. प्रस्तुत अर्ज हा दि.११.११.२०२० रोजी दाखल केलेला आहे. दि.०३.०७.२०१८ नंतर दि.११.११.२०२० पावेतो २ वर्षे, ४ महिने व ८ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो.

**८.** दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.२ हे आवश्यक पक्षकार होते. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्यामुळे त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. अर्जातील कारणांचा विचार करता वादींची विनंती मान्य केल्यास कोणत्याही प्रकारची बाधा राहणार नाही. तसेच मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट अर्ज मंजुर केल्यास मुळ दावा गुणदोषावर निकाली काढता येईल. या सर्व कारणास्तव प्रतिवादी क्र.२

चे वारस रेकॉर्डवर घेण्याकामी झालेला उशीर माफीचा अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. सबब वादींच्या कथनाप्रमाणे सदर दाव्यात प्रतिवादी क्र.२ चे वारस म्हणुन सामील करणे आवश्यक आहे. करिता मी खालील आदेश करीत आहेः–

## आदेश

१. वादींचा अर्ज नि.क्र.५१ रक्कम रु.१५००/– (रुपये एक हजार पाचशे फक्त) खर्च म्हणुन, त्यापैकी रक्कम रु.५००/– (रुपये पाचशे फक्त) प्रतिवादी क्र.३ यांना तसेच उर्वरित रक्कम रु.१०००/– (रुपये एक हजार फक्त) पुढील तारखेपर्यंत अगर तारखेपुर्वी सरकारजमा करावी या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम वादींनी जमा केल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी झालेला २ वर्षे, ४ महिने व ८ दिवसांचा विलंब माफ करण्यात येईल.

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2024.04.02 18:18:31 +0530

दौंड. [ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
दि. ०२.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड, जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>Jt. C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | :- | 02.04.2024. |
| Order signed by the<br>Presiding Officer on | :- | 02.04.2024. |
| Order uploaded on | :- | 02.04.2024. |